# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 15 November 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १५ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- विधानसभा निवडणूक प्रचाराचे अखेरचे तीन दिवस शिल्लक-प्रचारसभांसोबत प्रचार फेऱ्या आणि कॉर्नर बैठकांवर उमेदवारांचा भर
- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची हिंगोलीतल्या सभेत काँग्रेसवर कडाडून टीका;तर काँग्रेसकडून भाजपला जातनिहाय जनगणनेची भूमिका स्पष्ट करण्याचं आव्हान
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आचारसंहिता पथकाकडून १९ किलो सोन्यासह ३७ किलो चांदी जप्त

आणि

- भारत-दक्षिण आफ्रिका संघादरम्यान टी - ट्वेंटी क्रिकेट मालिकेत आज चौथा आणि शेवटचा सामना

****

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे अखेरचे तीन दिवस शिल्लक आहेत. या पार्श्वभूमीवर प्रचारसभा, प्रचार फेऱ्या, कॉर्नर बैठका आणि घरोघरी जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह स्थानिक छोट्या पक्षाचे उमेदवार तसंच अपक्ष उमेदवारांचा भर दिसून येत आहे. पारंपरिक पद्धतीने रिक्षांवर भोंगे लावून प्रचार करण्याला जवळपास सर्वच उमेदवारांनी पसंती दिल्याचं पहायला मिळत आहे.

****

केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी आज हिंगोली इथं रामलीला मैदानावर महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतली. महायुती सरकारने राबवलेल्या योजनांचा आढावा घेतांनाच, शहा यांनी काँग्रेस पक्षावर कडाडून टीका केली. काश्मीरमधून हटवलेलं कलम ३७० पुन्हा एकदा लागू करण्याचं आश्वासन काँग्रेस देत आहे, परंतु गांधी घराण्याची चौथी पिढीही हे काम करू शकणार नाही, असा दावा त्यांनी केला. हिंदुत्वाच्या मुद्यावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरही शहा यांनी टीका केली.
दरम्यान, शहा यांचं हिंगोलीत आगमन होताच, निवडणूक आयोगाच्या पथकाकडून त्यांच्या बॅगांची तपासणी करण्यात आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

मतदारांचं समर्थन मिळत नसल्याने, काँग्रेस पक्ष मतदारांची दिशाभूल करत असल्याचा आरोप, केंद्रीय मंत्री तथा भाजप नेते नितीन गडकरी यांनी केला आहे. ते आज गडचिरोली जिल्ह्यात अहेरीचे महायुतीचे उमेदवार धर्मरावबाबा आत्राम आणि गडचिरोलीचे उमेदवार डॉ.मिलिंद नरोटे यांच्या प्रचार सभेत बोलत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली राज्यघटना भाजप बदलणार आहे, असा खोटा प्रचार कॉग्रेस करत आहे, परंतु काँग्रेसनेच अनेकदा घटनेची मोडतोड केल्याचं गडकरी म्हणाले.

****

जातनिहाय जनगणनेबाबत भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांनी आपली भूमिका जाहीर करावी, असं आव्हान काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बालत होते. काँग्रेस अनुसूचित जाती–जमातींचं आरक्षण संपवणार असल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. काँग्रेसनेच आरक्षण देऊन मागास जातींना हक्क आणि अधिकार दिले, असं चेन्निथला यांनी नमूद केलं.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज वांद्रे इथं पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. गेल्या १९ वर्षात आम्ही काय केलं यावर ही पुस्तिका असल्याचं राज ठाकरे यांनी सांगितलं. १७ नोव्हेंबरला शिवाजी पार्क मैदानावर मनसेच्या सभेसाठी अद्याप परवानगी मिळालेली नाही, त्यामुळे वेळेअभावी ही सभा न घेता मतदार संघांना प्रत्यक्ष भेटी देणार असल्याचं राज ठाकरे यांनी सांगितलं.

महाराष्ट्राच्या विकासाबाबतच्या ब्लू प्रिंटवरून आपल्याला हिणवलं गेलं, त्या ब्लू प्रिंट मधील प्रश्नांचाच या जाहीरनाम्यात समावेश केल्याचं राज ठाकरे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पक्षाचे नेते विधिज्ञ प्रकाश आंबेडकर उद्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर येत आहेत. उद्या सायंकाळी आंबेडकर यांची आमखास मैदानावर प्रचार सभा होणार आहे.

****

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठीचं प्रत्यक्ष मतदान अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपलं आहे. या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा प्रशासनाकडून नियोजन, अंमलबजावणी, सोयीसुविधांच्या पूर्ततेसोबतच जनजागृतीसाठीही जोरदार प्रयत्न केले जात आहेत. मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी 'मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रम'-स्वीप उपक्रमांतर्गत पारंपरिक माध्यमांसोबतच अनेक अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात जनजागृती सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ४० लाख वीजदेयकांवर मतदानाचे संदेश प्रकाशित करण्यात आले आहेत. तर, २७ लाख बँक ग्राहकांना मतदानाचं आवाहन करणारे लघूसंदेश - एसएमएस पाठवण्यात आले आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेतर्फे मतदारांच्या सोयीसाठी १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीसाठी मध्य रेल्वे मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण या मार्गासह हार्बर रेल्वे मार्गावरून विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. मतदानाच्या दिवशी मुंबईत दिव्यांग मतदारांसाठी विशेष मोफत बस सेवाही दिली जाणार आहे.

****

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून देशातील दूरचित्रवाणी वाहिन्यांवर निवडणुकांसंबंधित प्रसारित होणाऱ्या बातम्यांवर लक्ष ठेवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मीडिया मॉनिटरिंग केंद्र स्थापन करण्यात आलं आहे. महाराष्ट्रात मतदान दिवसाच्या एक दिवस आधी तसंच मतदानाच्या दिवशी दूरचित्रवाणी वाहिन्यांवर प्रसारित होत

असलेल्या प्रत्येक बातमीवर लक्ष ठेवण्याचं काम केंद्रीय निवडणूक आयोगाकडून होणार आहे.

****

येत्या निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन सर्व मतदारांना करण्यात येत आहे. जालना इथला अभियांत्रिकी शाखेचा विद्यार्थी असलेला कैवल्य जोशी या नवमतदारानेही सर्वांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे –

**बाईट – कैवल्य जोशी, नवमतदार**

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज सातारा जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांची ५५५ वी जयंती आज सर्वत्र भक्तिभावानं आणि उत्साहात साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरु नानक जयंतीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

भगवान बिरसा मुंडा यांची जयंतीही आज साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसद भवन परिसरात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली, तसंच आकाशवाणीवरून नागरिकांना संबोधित करत, जनजातीय अर्थात आदिवासी गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

गुरु नानक जयंतीनिमित्त नांदेडच्या सचखंड गुरुद्वाऱ्यासह विविध गुरुद्वाऱ्यांमध्ये शबद, भजन, कीर्तन इत्यादी धार्मिक कार्यक्रमांमध्ये शीख बांधव मोठ्या संख्येनं सहभागी झाले आहेत.

कार्तिकी पौर्णिमा अर्थात त्रिपुरारी पौर्णिमाही आज साजरी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात ठिकठिकाणी दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. तुलसी विवाह सोहळ्याची आज सांगता होत आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आचारसंहिता अंमलबजावणीसाठी नियुक्त स्थिर सर्व्हेक्षण पथकानं काल रात्री सिल्लोड मतदार संघात निल्लोड फाटा इथं १९ किलो सोने आणि ३७ किलो चांदी जप्त केली. याची किंमत अंदाजे १९ कोटी रुपयांची आहे, असं आचारसंहिता कक्षाचे सहायक नोडल अधिकारी राजेंद्र देसले यांनी कळवलं आहे.

****

लातूर जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून भरारी पथकं आणि स्थिर निगराणी पथकांनी जवळपास ४२ लाख ३३ हजार ४०० रुपयांची रोकड जप्त केली. या बाबत पुढची सुनावणी १८ नोव्हेंबरला होणार आहे.

****

धुळे जिल्हात आचारसंहिता लागू झाल्यापासून गेल्या एक महिन्यात ‘सी-व्हिजिल ॲप’ वर एकूण ५४ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी ३० तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून २४ तक्रारी चुकीच्या असल्याचं समोर आलं, यापैकी ६ तक्रारी जिल्हा स्तरावर तर १८ तक्रारी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर फेटाळण्यात आल्या आहेत.

****

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीचे मतदान शांततेत आणि प्रलोभनमुक्त होण्यासाठी राज्य सीमेवरील तपासणी नाक्यावर कडक तपासणी करावी असे निर्देश केंद्रीय निवडणूक पोलीस निरिक्षक अभिषेक मिना यांनी दिले आहेत. मिना यांच्या अध्यक्षतेखाली आज धुळ्यात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.

****

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान सुरु असलेल्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला चौथा आणि शेवटचा सामना आज जोहान्सबर्ग इथं खेळला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री साडे आठ वाजता सामन्याला सुरुवात होईल. या मालिकेत भारत दोन-एकनं आघाडीवर आहे.

****

गोव्यातील पणजी इथं होणाऱ्या ५५ व्या ‘इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया’ अर्थात ‘इफ्फी’मध्ये झळकण्याचा मान ‘हजारवेळा शोले पाहिलेला माणूस’ या बहुचर्चित मराठी चित्रपटाला मिळाला आहे. या चित्रपटाला गाला प्रीमियर

आणि रेड कार्पेटचा सन्मान जाहीर झाला असून २४ नोव्हेंबरला हा सोहळा होणार आहे.

****